# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक ३६/२०२१** **दिनांक ०४/०५/२०२१** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २८/०४/२०२१ ते ०४/०५/२०२१) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०५/०५/२०२१ सकाळी ८:३० पासून ०९/०५/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: कृषि हवामान वेधशाळा, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| २८/०४ | २९/०४ | ३०/०४ | ०१/०५ | ०२/०४ | ०३/०५ | ०४/०५ | | ०५/०५ | ०६/०४ | ०७/०५ | ०८/०५ | ०९/०५ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | २ | १ | ३ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३५ | ३४ | ३४ | ३४ | ३४ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से) | २३ | २४ | २४ | २५ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७३ | ७१ | ७७ | ७७ | ७२ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ६८ | ६९ | ६८ | ६८ | ६९ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग(किमी/तास) | ४ | ५ | ४ | ६ | ६ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | द. | वा.प. | वा.ऊ. | वा. | वा. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२१ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३०९०.६ |

## हवामान सारांश /इशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्हयात दिनांक ७ ते ९ मे, २०२१ दरम्यान जिल्हयातील तुरळक ठिकाणी अतिशय हलक्या पाऊसाची शक्यता असून किमान तापमानात वाढ संभवते तसेच आकाश निरभ्र राहील.** |
| **विस्तारित श्रेणी अंदाज** | **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक ९ ते १५ मे, २०२१ दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त, कमाल आणि किमान तापमान हे सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.** |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | -- | • उष्णता वाढल्यामुळे काही कारणाने आंबा किंवा काजू बागां मध्ये वणवा लागण्याची शक्यता असते. वणव्यामध्ये सापडलेल्या आंबा, काजू बागेमधील झाडांना लगेचच पाणी देणे सुरु करणे आवश्यक असते त्यामुळे नवीन पालवी फुटेपर्यंत पाण्याचे योग्य नियोजन करावे. २५ ते ३० फुट उंच झाडांची उंची अर्ध्यापर्यंत कमी करावी तसेच इतर झाडांची उंची ८ फुटापर्यंत कमी करावी. त्यानंतर १ लिटर डांबराच्या द्रावणामध्ये ५ ग्रॅम बाविस्टीनची भुकटी मिसळून कापलेल्या फांद्यांच्या भागावर लावावे. खोडकीडीपासून संरक्षण करण्यासाठी क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही २० मि.ली. प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात द्रावण तयार करून संपूर्ण झाड भिजवून घ्यावे. होरपलेल्या झाडांचे प्रखर सूर्यकिरणांपासून संरक्षण करण्यासाठी १ किलो चुना + १५० ग्रॅम मोरचूद या प्रमाणात द्रावण तयार करून झाडाला ब्रशच्या सहाय्याने लावावे. |
| **विशेष सल्ला** | -- | • देठकुजव्या आणि फळकूज ह्या काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी फळे काढणी नंतर लगेच ५२ अं.सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे वाळविण्यासाठी हवेशीर ठिकाणी ठेवावी. |

| | | |
|---|---|---|
| **आंबा** | फळधारणा | • दिनांक ५ ते ९ मे २०२१ दरम्यान तुरळक ठिकाणी अतिशय हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची चौदा आणे (८० ते ८५ टक्के) पक्वतेला देठासह काढणी झेल्याच्या सहाय्याने सकाळी लवकर किंवा संध्याकाळी ४ नंतर पाउसाचा अंदाज घेवून करावी. उष्णतेमुळे फळांचे तापमान वाढून साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते यासाठी फळांची काढणी तापमान कमी असताना करावी आणि लगेच सावलीमध्ये ठेवावी.<br>• देठकुजव्या आणि फळकूज ह्या काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी फळे काढणी नंतर लगेच ५२ अं.सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत व नंतर फळे वाळविण्यासाठी हवेशीर ठिकाणी ठेवावी. त्यानंतर प्रतवारी करून फळे पिकविण्यासाठी आढीत घालावीत. वाहतूक करण्यासाठी फळांचा रंग बदलू लागल्यानंतर कोरोगोटेड फायबर बॉक्समध्ये फळे पकिंग करावीत. कच्च्या आंब्याची वाहतूक करावयाची असल्यास कोरोगोटेड फायबर बॉक्समध्ये पेंड्याचा वापर करावा तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी.<br>• आंबा फळांवर फळमाशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने बागेमधील गळलेली फळे गोळा करून नष्ट करावीत आणि आंबा फळांचे फळमाशी पासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले “रक्षक फळमाशी सापळा” प्रती एकरी २ या प्रमाणात बागेमध्ये झाडांच्या उंचीप्रमाणे साधारण जमिनीपासून २ ते ३ मीटर उंचीवर राहील अशा प्रकारे टांगावा. |
| **उन्हाळी भात** | दाणे भरणे ते पक्वता | • उन्हाळी भात पिक दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने शेतात पाण्याची पातळी ५ सें. मी. पर्यत ठेवावी. हळवे भात पक्व होवू लागल्यास कापणीपूर्वी शेतातील पाणी काढून टाकावेत.<br>• दिनांक ७ ते ९ मे २०२१ दरम्यान अतिशय हलक्या पाऊसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या हळवे भाताची कापणी सकाळच्या वेळेस जमिनीलगत करावी. कापणी केलेल्या भाताची लगेच मळणी करून धान्य कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे. |
| **हळद** | पूर्वमशागत | • हळद लागवड करावयाच्या क्षेत्रामध्ये नांगरणी करावी. नांगरणीच्या वेळेस प्रती गुंठा २५० ते ४०० किलो चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्टखत मिसळावे. इतर पिकांचे अवशेष व धसकटे वेचून जमीन स्वच्छ करावी. हळदीची लागवड मे ते जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत केल्यास चांगले उत्पादन मिळते. हळद पिकामध्ये कंद माशीचा प्रादुर्भाव बहुतांशी वेळा दिसून येतो. यासाठी सुरुवातीपासूनच किडीचे व्यवस्थापन केल्यास नियंत्रण करणे शक्य आहे. लागवडीपूर्वी १० ते १५ दिवस अगोदर मातीच्या छोट्या मडक्यामध्ये किंवा प्लास्टिकच्या बरणी मध्ये खराब झालेली सुकी मासळी ओलसर करून अशी बरणी शेतामध्ये ४ ते ५ ठिकाणी ठेवावीत. कंद माशीच्या माद्या या आमिषाला आकर्षित होवून तेथे अंडी घालतात. साधारणपणे ४ ते ५ दिवसांनी अशी सुकी मासळी जाळून नष्ट करावी. |
| **भाजीपाला** | रोपवाटिका | • पाण्याची उपलब्धता असल्यास खरीप हंगामासाठी वांगी, मिरची, टोमेटो आणि इतर भाजीपाला पिकाची रोपे तयार करण्याकरिता रोपवाटिकेची कामे सुरु करावीत. जमिनींची नांगरणी करून ३ मी. लांब x १ मी. रुंद x १५ से.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावे. वांगी, मिरची, टोमेटो पिकांवर मर रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो यासाठी रोग प्रतिकारक जातींची निवड करावी. सातत्याने मर रोग येणाऱ्या शेतामध्ये फेरपालट करावी तसेच तीन वर्षापर्यंत वांगी कुळातील पिके एकाच शेतात लावू नयेत. |
| सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा. | | |